# गरुड झेप

सहकार्यम् यशोधनम्
स्थापना – १९४९

www.janatabankpune.com

सन २०१५ – अंक ३ रा (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खाजगी वितरणासाठी)


## अध्यक्षांचे लेखणीतून,



ज्ञानार्जन करावयाचे ते विद्यार्थी दशेत व तदनंतर नोकरी उद्योग करावयाचा ही पूर्वीची पद्धत झाली. हत्यारे किंवा यंत्रे जर वापरात ठेवली नाहीत तर गंजून जातात, निरुपयोगी ठरतात. तदवतच माणसाची कार्यक्षमता टिकून राहण्यासाठी सतत कार्यरत असणे आवश्यक असते. बँकेत आपण जी कामे करतो ती शारीरिक नसून बौद्धीक असतात. त्यामुळे आपली बौद्धीक क्षमता महत्त्वाची ठरते. संशोधनात असे दिसून आले आहे की, आपल्या बुद्धीचा जास्तीत जास्त वापर करणाऱ्यांमध्ये शास्त्रज्ञ, विद्यार्थी, प्रोफेशनल्स उदा. डॉक्टर, वकील, सीए वगैरेंचा समावेश होतो. आता गेल्या काही दशकात माहितीचा विस्फोट झाला आहे व इंटरनेट द्वारे पाहीजे त्या विषयावर अमाप माहिती जवळजवळ फुकटच उपलब्ध झाली आहे. इंटरनेट करिता जे काही नाममात्र चार्जेस भरावे लागतात व जी काही वीज जळते तेवढाच आपला खर्च, टीव्ही व वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे ग्राहक अधिकाधिक जागरूक होवू लागला आहे. ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत अनेक उपशाखा निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर बँकेतील प्रत्येक सेवकाने आपल्या कामाविषयी, बँकींग विषयी अद्ययावत माहिती ठेवणे अत्यावश्यक झाले आहे.

अनुभवातून, प्रत्यक्ष कामातून माहिती मिळते पण प्रत्यक्ष कामाचा महत्त्वाचा उपयोग माहिती मिळविणे हा नसून मिळालेल्या माहितीचे दृढीकरण करणे, प्रत्यक्ष वापर करून ग्राहकांना उत्तमोत्तम तत्पर सेवा देणे हा असला पाहिजे. आपल्या सेवकांना अद्ययावत माहिती असावी यासाठी आपण सर्क्युलर काढतो, शाखापातळीवर दरमहा स्टाफ मिटींग घेतो, त्यामध्ये चर्चा करतो, मुख्यकार्यालयाकडील अधिकारी, गार्डीयन एक्झीक्युटीव्ह येतात त्यावेळी स्टाफ मिटींग घेवून त्यात माहिती व अनुभवांचे अदान प्रदान करतो हे केवळ प्राथमिक पातळीवरचे उपाय झाले. तसेच आपण आपल्या प्रशिक्षण वर्गात व शाखांमध्ये जाऊन प्रशिक्षण वर्ग घेतो, यात वाढ म्हणून ४ महिन्यांपूर्वी आपण इ-लर्निंगचा उपक्रम चालू केला आहे. यात ऑनलाईन परिक्षा घेत आहोत. इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ बँकींग अॅण्ड फायनान्स ही संस्था पूर्वी फक्त जेएआयआयबी व सीएआयआयबी या दोनच परिक्षा घेत असे. ते आता विविध प्रकारच्या ३० परीक्षा घेतात. सदर विविध विषयांच्या परीक्षांसाठी अभ्यास करून त्या परीक्षा पास होणाऱ्या सेवकांसाठी आपण प्रोत्साहनात्मक नियमावलीचा फेरविचार केला आहे. आपण सर्वांनी आपले बँकिंग विषयक ज्ञान अद्ययावत ठेवावे यासाठी मॅनजमेंट कडून आपणांस जे सहाय्य हवे ते मिळत आहे. सेवकांच्या मनःपूर्वक सहभागाची आवश्यकता आहे. सुरूवातीस सांगितल्याप्रमाणे ज्ञानार्जनाला वयाची अट नसते. काळाप्रमाणे व ग्राहकांच्या अपेक्षांप्रमाणे आपल्याला आपल्यामध्ये बदल करणे अपरिहार्य आहे. आपण वापरत असलेली तंत्रज्ञान प्रणाली/यंत्रे ही अद्ययावत असून भागत नाही. हे तंत्रज्ञान व यंत्रे वापरणाऱ्या व्यक्तींना अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक असते ही बाब प्रत्येक सेवकाने लक्षात घ्यावी. अत्याधुनिकतेची आस आता समाजाचा स्थायीभाव झाला आहे. आपणही मागे राहून चालणार नाही.

तुमच्या ज्ञानार्जनासाठी हार्दीक शुभेच्छा!

**– अरविंद खळदकर**

## राजीव बर्वे यांना 'उत्कृष्ठ अधिकारी' पुरस्कार



आपल्या बँकेचे सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. राजीव बर्वे (सध्या शाखा व्यवस्थापक, टिळक रोड शाखा, पुणे) यांना सहकारी बँकिंग क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल नुकतेच राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उत्कृष्ठ अधिकारी म्हणून गौरविण्यात आले. श्री. बर्वे यांची आपल्या बँकेत सेवेची २६ वर्षे पूर्ण झाली आहेत. जनता बँक परिवाराच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

'दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् असोसिएशन'चा अमृत महोत्सव सांगता समारंभ व १९ वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ १७ एप्रिल २०१५ रोजी रवींद्रनाट्य मंदिर, प्रभादेवी येथे संपन्न झाला. या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी केंद्रिय भुपृष्ठ वाहतूक मंत्री श्री. नितीनजी गडकरी, केंद्रीय अर्थराज्यमंत्री श्री. जयंत सिन्हा, श्री. दिलीप वळसे पाटील, संजय भेंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## इंदापूर येथे ऑफसाईट एटीएमचे उद्घाटन



आपल्या बँकेचे ऑफसाईट एटीएम व मेगाबँकर सुविधा इंदापूर येथे नुकतीच सुरू करण्यात आली. या सुविधेचे उद्घाटन सोनई डेअरीचे अध्यक्ष व आपले इंदापूर शाखेचे खातेदार श्री. दशरथ माने यांच्या शुभहस्ते शनिवार दि. २८/३/२०१५ रोजी करण्यात आले. याप्रसंगी स्थानिक सभासद, खातेदार, तसेच बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

# जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन आयोजित आनंद मेळा




**आनंद मेळ्याच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये आ. प्रा. मेधा कुलकर्णी, तज्ज्ञ संचालक श्री. विजय भावे, उपाध्यक्ष श्री. संजय लेले, महानगर प्रचारक श्री. आण्णा वाळिंबे, महानगराचे सहकार्यवाह श्री. कैलास सोनटक्के व अन्य मान्यवर.**

दि. १ मे रोजी कामगार दिनाचे औचित्य साधून स्टाफ वेल्फेअर असोसिएशन, जनता वेल्फेअर सोसायटी, जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ, जनता बँक गणेशोत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे शहर व जिल्ह्यातील सेवकांकरीता आनंद मेळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर मेळ्याचे उद्घाटन मा. आमदार सौ. मेधा कुलकर्णी यांचे हस्ते झाले.

सदर मेळ्यास बँकेचे मा. अध्यक्ष श्री. खळदकर साहेब, मा. उपाध्यक्ष श्री. लेले साहेब, मा. संचालक सर्वश्री भावे, पंडीत, जगदीश कदम, खोमणे साहेब तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुलकर्णी साहेब यांनी भेट दिली. बँकेचे अनेक वरिष्ठ अधिकारी त्यावेळी उपस्थित होते. बँकेच्या अनेक सेवकांनी सहकुटुंब भेट देवून मेळ्याचा आनंद घेतला. अंदाजे २००० जणांनी या आनंद मेळ्यास भेट दिली.

सदर मेळ्यात कलादालन वस्त्र भांडारतर्फे पैठणी करीता स्पर्धा होती. वसुली विभागातील सेवक कु. मुक्ता आरे यांना पैठणी बक्षीस मिळाली. प्रसिद्ध शाहीर श्री. मावळे यांनी महाराष्ट्र दिनानिमित्त महाराष्ट्र गीते सादर केली. तसेच मर्दमराठा गटातर्फे मर्दानी खेळ उदा. लाठी काठी, तलवार बाजी, दांडपट्टा, डोक्यावर नारळ फोडणे सादर केले गेले. पुणे डिस्ट्रीक्ट योगा ॲण्ड फिटनेस इन्स्टीट्यूट, निगडी पुणे संस्थेमार्फत योगासनांची प्रात्याक्षिके सादर केली गेली. योगासनाचे प्रशिक्षक श्री. चंद्रकांत पांगारे यांचे मार्गदर्शनाखाली ७ आंतरराष्ट्रीय व ४ राष्ट्रीय योगासनपटूंनी अवघ्या १० मिनीटामध्ये अवघड व अतिअवघड अशा २६८ योगासनांचे कलात्मक योगदर्शन घडविले. मेळ्यामध्ये बैलगाडी, घोडागाडी, बग्गी, उंट रपेट साठी उपलब्ध होते. त्याचा आनंद अनेकांनी सहपरिवार लुटला. तसेच रपेटसाठी बुलेटही उपलब्ध होती. आनंद मेळ्यामध्ये खेळांचे विविध प्रकारचे स्टॉल होते. तसेच लहान मुली भातुकलीच्या खेळात वापरतात अशा वस्तूंचे एक सुंदर प्रदर्शन होते, आनंद मेळाव्यास भेट देणाऱ्या सर्वांना वेलकम ड्रिंक, अल्पोपहार, भोजन अशा प्रकारची उत्तम सुविधा उपलब्ध केली गेली होती.

## KNOWLEDGE PAGE

प्रत्येक व्यक्तित काहीना काही दुर्गुण असतातच. पण वरकरणी ती स्वच्छ व चारित्र्यसंपन्न वाटते अशा व्यक्तिमधील छुपे अवगुण वर्णन करताना आयार्विंग वॉलेस या लेखकाने एक छान वाक्प्रचार वापरला आहे.

**EVERY MAN HAS SHADOW**

## अभिनंदन !

**बँकिंग परिक्षांमधील यशाचे मानकरी**

**श्री. आनंद रमेश पाटणकर,**

**विधी वसुली विभाग, वरिष्ठ अधिकारी,**

**जेअेआयआयबी उत्तीर्ण!**

# अ. भा. वि. प.च्या विद्यार्थ्यांची सिंहगड रोड शाखेला भेट



**सिंहगड रोड शाखा व्यवस्थापक श्री. धनंजय कानडे यांना पुष्पगुच्छ देताना विद्यार्थी युवक-युवती.**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने कॉलेज युवक आणि युवतीसाठी दिनांक १८ मे,२०१५ रोजी एकदिवसीय शिबीर आयोजित केले होते.

शिबिराचा एक भाग म्हणून बँकेत् चालणारे दैनंदिन कामकाज या विषयासाठी सदर परिषदेच्या युवक-युवतींनी बँकेच्या सिंहगड रोड शाखेला भेट दिली. बँकेतील प्रोबेशनरी कनिष्ठ अधिकारी सौ. जान्हवी स. कुलकर्णी यांनी ठेव, मुदतठेव तसेच कर्ज आणि इतर टेक्नो-बेस्ड् प्रोडक्ट्स, ATM मशिन, Kiosk मशिन आणि बँकेत अंतर्गत चालणाऱ्या व्यवहाराबाबत माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांचे शंकानिरसन केले.

विद्यार्थ्यांनी सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## बँकेच्या सहकार्याने विविध सामाजिक संस्थांना निधी प्रदान

आपल्या बँकेच्या एक्झीक्युटर व ट्रस्टी विभागाकडे व्यवस्थापनासाठी असलेल्या रत्नागिरी, दापोली येथील कै. प्रभाकर दामोदर भागवत यांचे इच्छापत्रामधे नमूद असलेल्या नऊ संस्थांना प्रत्येकी रु. ५ लाख याप्रमाणे एकूण रु. ४५ लाख रुपयांची रक्कम बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर यांच्या हस्ते नुकतीच सन्मानपूर्वक अदा करण्यात केली. यावेळी उपाध्यक्ष श्री. संजय लेले, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी व अन्य अधिकारी, सेवक वर्ग उपस्थित होते.

निधी प्रदान केलेल्या संस्थांमधे श्री. विजय फळणीकर यांचे आपलं घर, गडचिरोलीसाठी डॉ. अभय बंग, आनंदवनासाठी डॉ. प्रकाश आमटे, जयपूर येथील भगवान महावीर विकलांग साहित्य समिती, डोंबिवली येथील राष्ट्रीय शिक्षण संस्था, वनवासी कल्याण आश्रम, मुंबईचे श्री. विकास वालावलकर, वाघोली येथील भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट, दापोलीचे डॉ. चंद्रशेखर मोडक यांचा समावेश होता.

यावेळी बोलतांना बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर म्हणाले की, पुणे जनता सहकारी बँक ही निव्वळ व्यावसायिक संस्था नसून समाज कल्याणाचा वसा घेऊन उदयाला आलेली एक नागरी सहकारी बँक आहे व याच हेतूने बँकेकडे सार्वजनिक विश्वस्त निधी, खासगी विश्वस्त निधी तसेच इच्छापत्राच्या व्यवस्थापनाचे काम केले जाते. धकाधकीच्या काळात जीवनमान समृद्ध झाले असले तरी माणूस असुरक्षित जाणवू लागला आहे. आपल्या आयुष्याच्या कमाईचा आपल्या पश्चात योग्य विनियोग व्हावा व त्यादृष्टीने आपण स्वतःचे इच्छापत्र केले पाहिजे. यासाठी व्यवस्थापक आणि त्यानंतर त्याची अंमलबजावणी करणेसाठी जनता बँकेने जून १९८९ मध्ये एक्झीक्युटर व ट्रस्टी विभागाची स्थापना करून अशी सेवा देण्यास सुरूवात केली आहे. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुलकर्णी म्हणाले की, नुकत्याच संपलेल्या मार्च २०१५ च्या वर्षाअखेर बँकेने रु. ११८२० कोटीच्या एकूण व्यवसायाचा टप्पा पूर्ण केला आहे. मार्च १५ अखेर बँकेच्या ४६ शाखा असून या आर्थिक वर्षात नवीन ८ शाखा उघडण्याचा बँकेचा मानस असून महाराष्ट्राबरोबरच गुजरात येथेही बँकेची शाखा आहे. सध्याच्या सहकारी बँकांच्या तुलनेत जनता बँकेची कामगिरी अग्रेसर आहे. निधी प्रदान कार्यक्रमासारख्या स्तुत्य कार्यक्रमामुळे समाजामध्ये असे काम विश्वासाने करणारी विश्वस्त संस्था म्हणून बँकेच्या नावलौकिकात भरच पडली आहे.



**बँकेच्या सहकार्याने विविध संस्थांना निधी प्रदान करण्यात आला. त्यावेळी बसलेले (डावीकडून) बँकेचे अधिकारी श्री. संतोष हिरवे, उपाध्यक्ष श्री. संजय लेले, अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी व सहमहाव्यवस्थापक श्री. जयंत काकतकर व उभे असलेले सर्व संस्थांचे पदाधिकारी.**

### ❊ भावपूर्ण श्रद्धांजली ❊

बँकेच्या कर्वेनगर शाखेतील लेखनिक रवींद्र सदाशिव महाबळेश्वरकर यांचे दि. २४ एप्रिल २०१५ रोजी दुःखद निधन झाले. ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्‌गती देवो.
कै. महाबळेश्वरकर यांच्या कुटुंबियांच्या दुःखात जनता बँक परिवार सहभागी आहे.

## बचतगटाच्या मेळाव्याला लाभले मा. कुलकर्णींचे मार्गदर्शन

पुणे – ''महिला बचत गटांनी नवीन माध्यमांचा वापर करीत व्यावसायिक दृष्टिकोतून काम केल्यास गट सक्षम होतील,'' असे मत आपल्या बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. वसंतराव कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

महिला महासंघ, प्रेरणा भगिनी सेवा सहकारी संस्था व युवा प्रतिष्ठानतर्फे बचत गटांच्या महिलांचा मेळावा आयोजिला होता. मेळाव्याचे उद्‌घाटन कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. या वेळी अभिनेत्री पूजा पवार, पत्रकार राही भिडे, महासंघाच्या अध्यक्षा शोभा कापडे, स्वागताध्यक्षा भारती अंकलेल्लू, ॲड. मालती शर्मा उपस्थित होत्या. ''महिला बचत गटांनी कुटुंबव्यवस्थेत लक्ष घातल्यास बरेच वाद मिटतील.'' असे ॲड. शर्मा यांनी सांगितले.

## शाखा वर्धापनदिनाच्या शुभेच्छा !

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अंबेजोगाई | १ मे | गिरगाव | १४ मे | माखजन | २३ मे | चिंचवड गाव | १० जून |
| भोर | ६ मे | मार्केटयार्ड | २१ मे | देवरूख | २३ मे | पिंपरी | १४ जून |
| भवानी पेठ | ९ मे | रत्नागिरी | २३ मे | संगमेश्वर | २३ मे | फोर्ट | २८ जून |
| घोडनदी | १३ मे | शिवाजीनगर रत्ना. | २३ मे | पावस | २३ मे | चिपळूण | ४ जुलै |
| विलेपार्ले | १४ मे | साखरपा | २३ मे | फर्ग्युसन कॉलेज | ३ जून | धनकवडी | २९ जुलै |

# भारतीय रिझर्व्ह बँकेची महत्वाची परिपत्रके

### १) परिपत्रक क्र.आरबीआय/४३५/२०१४-१५ दि.२३/०१/२०१५

**विषय : नागरी सहकारी बँकांनी क्रेडिट इन्फर्मेशन कंपनीचे सभासद होण्याविषयी**

भारतीय रिझर्व्ह बँकेने भारतातील नागरी सहकारी बँकांना दि. १/१२/२००९ रोजी क्रेडिट इन्फर्मेशन कंपन्यांचे सभासद होण्याविषयी कळविले आहे.

भारतात सध्या चार क्रेडिट इन्फर्मेशन कंपन्या कार्यरत आहेत.

- क्रेडिट इन्फर्मेशन बूरो ऑफ इंडिया लि.
- इक्वीफॅक्स क्रेडिट इन्फर्मेशन सर्व्हिसेस प्रा. लि.
- एक्सपेरियन क्रेडिट इन्फर्मेशन कंपनी इंडिया प्रा. लि.
- सीआरआयएफ - हायमार्क क्रेडिट इन्फर्मेशन कंपनी इंडिया प्रा.लि.

बँका या कंपन्यांचे सभासद झाल्यानंतर कर्जदाराची कर्ज विषयी माहिती त्यांना प्राप्त होऊ शकते. बँक एखाद्या विशिष्ठ सभासद नसलेल्याही माहिती मिळत नाही. कर्जाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी बँकंना इतर सर्व क्रेडिट इन्फर्मेशन कंपन्यांचे सभासद होण्याचा सल्ला भारतीय रिझर्व्ह बँकांना दिला आहे.

### २) परिपत्रक क्र.आरबीआय/४३६/२०१४-१५ दि.२८/०१/२०१५

**विषय - आर्थिकदृष्ट्या सक्षम व उत्तम व्यवस्थापन बँकेच्या निकषांतील बदल**

दि. १३/१०/२०१४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेने परिपत्रकाद्वारे आर्थिकदृष्ट्या व उत्तम व्यवस्थापन बँकेची व्याख्या करून बँकांना कळविली. या वर्गीकरणाच्या निकषात भरतीय रिझर्व्ह बँकेने 'रेग्यूलेटरी कम्फर्ट' विषयी निकषात काही बदल केले आहेत. यापुढे रेग्यूलेटरी कम्फर्ट पोटी बँकांना इतर निकषांबरोबर बँकिंग रेग्यूलेशन ॲक्टच्या तरतुदी भारतीय रिझर्व्ह बँक कायदा तसेच रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या सर्व मार्गदर्शक निकषांचे पालन करणे देखील बंधनकारक आहे.

### ३) परिपत्रक क्र.आरबीआय/४४६/२०१४-१५ दि.०२/०२/२०१५

**विषय : बँकिंग रेग्यूलेशन ॲक्ट १९४९ च्या कलम २४ अंतर्गत स्टॅट्युटरी लिक्विडीटी रेशोची पूर्तता**

दि.३/०२/२०१५ रोजी भारतीय बँकेने सहाव्या द्वैमासिक मॉनिटरी पॉलीसी स्टेटमेंट द्वारे नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच राज्य सहकारी बँका यांना स्टॅटयुटरी लिक्विडीटी रेशो २२.०० वरून २१.५० करण्यात आल्याविषयी कळविले आहे. सदर बदल दि. ७/०२/२०१५ पासून आस्तित्वात येतील.

### ४) परिपत्रक क्र. आरबीआय/४७३/२०१४-१५ दि.८/०२/२०१५

**विषय : नॅशनल कमिशन ऑफ मायनॉरिटीज कायदा १९९२ कलम २ (सी) अंतर्गत जैन समाजाला मायनॉरिटी स्टेटस बहाल करण्यात आले आहे. त्यांना कर्ज पुरवठा करण्याविषयी**

दि. २७/०१/२०१५ रोजी अल्पसंख्यांक मंत्रालयाने जैन समाजास मायनॉरिटी स्टेटस बहाल केले आहे. सर्व बँकांना सूचित करण्यात येते की, सिख, मुस्लीम, ख्रिस्ती, झोरे, स्ट्रीयन, बुद्धीस्ट समाजाप्रमाणे जैन समाजास देखील कर्ज मंजूर करताना मायनॉरिटी कॅम्युनिटी स्टेटस नुसार विचार व्हावा.

### ५) परिपत्रक क्र.आरबीआय/४८१/२०१४-१५ दि.२७/०२/२०१५

**विषय : बँकांतील अनक्लेम्ड तसेच इन ऑपरेटिव्ह खात्याविषयी**

भारतीय रिझर्व्ह बँकेने दि.१/०९/२००८ आणि दि. १८/०२/२००९ रोजी नागरी सहकारी बँका तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना इन ऑपरेटिव्ह (सलग दोन वर्षे व्यवहार नसलेली) तसेच अनक्लेम्ड (सलग दहा वर्षे व्यवहार नसलेली) खात्यांचे बाबतीत अधिक सतर्क राहण्याबद्दल कळविले होते. बँकांनी या खात्यांचा दरवर्षी आढावा घ्यावा. त्याचप्रमाणे या खात्यांवर पुन्हा व्यवहार करीत असताना अधिक सतर्क राहण्याचा सल्ला दिला होता.

या खात्याविषयी माहिती बँकांनी त्यांच्या वेबसाईटवर जाहीर करावी. या खातेदारांच्या शोधासाठी बँकांनी स्वत:हून अभियान राबवावे व त्यांना शोधण्याचा प्रयत्न करावा. सर्व प्रयत्नांनंतर अनक्लेम्ड राहिलेली खाती व्याजासह भारतीय रिझर्व्ह बँकेस डिपॉझीटर एज्युकेशन आणि अवेअरनेस फंड २०१४ या खात्यात जमा करण्यासाठी वर्ग करावी. रक्कम वर्ग केलेल्या सर्व खात्यांची माहिती त्याच प्रमाणे वर्ग केलेली रक्कम याचे रेकॉर्ड बँकेत अद्ययावत ठेवावे. खातेदार खाते चालविण्यासाठी बँकेत आल्यास त्याच्या खरेपणाची खातरजमा केल्यानंतरच रक्कमेचा दावा विहीत नमुन्यात भारतीय रिझर्व्ह बँकेस सादर करावा. रिझर्व्ह बँकेस वर्ग केलेली रक्कम दावा मंजूर झालेली खाती आणि प्रत्येक महिन्याअखेर या खात्यातील येणेबाकी याचे पूर्ण नोंद बँकांनी अद्ययावत ठेवावी. माहिती अद्ययावत करण्यासाठी रिझर्व्ह बँकेत दि. ३०/०६/२०१५ पर्यंत मुदत दिली आहे.

### ६) परिपत्रक क्र.आरबीआय/५३२/२०१५-१६ दि.१०/०४/२०१५

**विषय : नो युवर कस्टमर प्रोप्रायटरी खात्यासंबंधी सूचना**

भारतीय रिझर्व्ह बँकेने दि.१/०७/२०१४ रोजी परिपत्रकाद्वारे बँकांना सूचित केले होते की प्रोप्रायटरी फर्मचे खाते उघडत असताना त्यांच्या उपक्रमाचा पुरावा म्हणून दोन दस्तऐवज दप्तरी घ्यावेत. काही उपक्रमांना दोन दस्तऐवज सादर करणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीमध्ये एक दस्तऐवज घेऊन खाते उघडण्यास हरकत नाही. पण बँकांनी सदर उपक्रमाची त्यांनी बँकेस सादर केलेल्या पत्त्यावर जाऊन खातरजमा करून घ्यावी. बँकेस उपक्रमाविषयी सादर केलेला एक पुरावा उपक्रमाविषयी सरकारी प्रोफेशनल बॉडीने सादर केलेले लायसेन्स अथवा प्रॅक्टिसचे प्रमाणपत्र असावा असा उल्लेख दि. १/०७/२०१४ च्या परिपत्रकात केलेला आहे. बँकांनी रिझर्व्ह बँकेच्या के.वाय.सी. विषयी नियमांचे पालन करावे.

### ७) परिपत्रक क्र.आरबीआय/५७७/२०१५-१६ दि.३०/०४/२०१५

**विषय : रिझर्व्ह बँकेचे मासिक पतधोरण २०१५-१६ शेड्यूल्ड बँकांना क्रेडिट कार्ड सुविधे विषयी**

भारतीय रिझर्व्ह बँकेने वर्ष २०१५-१६ चे द्वैमासिक पत धोरण दि. ७/०४/२०१५ रोजी जाहीर केले आहे. सदर धोरणात रिझर्व्ह बँकेने फायनान्शिअली साउंड आणि वेल मॅनेजड शेड्यूल्ड अर्बन को ऑप बँकांना आपल्या व्यवसायाच्या विस्तारासाठी त्यांचे ग्राहकांना क्रेडिट कार्ड उपलब्ध करून देण्यास परवानगी दिली आहे. क्रेडिट कार्ड सुविधा फक्त खालील बँकांनाच वापरता येईल. बँक : ✻ फायनान्शिअली साउंड आणि वेल मॅनेजड शेड्यूल्ड अर्बन को ऑपरेटिव्ह बँक ✻ बँकेत कोअर बँकिंग कार्यप्रणाली कार्यान्वित असावी. ✻ बँकेची कमीत कमी निव्वळ - पत (नेटवर्थ) रूपये शंभर कोटी एवढी असावी. ✻ क्रेडिट कार्ड वापरण्या विषयी सविस्तर कार्यपद्धती परिपत्रकासोबत जोडली आहे.

## लातूर शाखा सुवर्ण महोत्सवी वर्ष शुभारंभानिमित्त कार्यक्रम साजरा

लातूर शाखेची स्थापना दिनांक २६/०२/१९६६ रोजी झाली आहे. दिनांक २६/०२/२०१५ रोजी शाखेने सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले. त्या निमित्ताने गुरुवार दिनांक २६/०२/२०१५ रोजी ग्राहक, सभासद आणि हितचिंतक यांचा मेळावा ''हॉटेल ग्रँड एक्झीक्युटीव्ह'' येथे आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास मा. श्री. अशोकराव कुकडे क्षेत्रीय संघचालक रा. स्व. संघ, बँकेचे माजी संचालक श्री. हुकुमशेठ कलंत्री, श्री. सत्यनारायणजी कर्वा, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंतराव कुलकर्णी, सह - महाव्यवस्थापक श्री. काकतकर साहेब उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लातूर शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. चंद्रशेखर साठे यांनी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात मा. श्री. कुकडे काका यांनी बँकेच्या आणि लातूर शाखेच्या प्रगती संदर्भात गौरवोउद्गार काढले तसेच बँकेने आर्थिक आणि सामाजिक कार्यात केलेल्या कामगिरीचे विशेषत्वाने कौतुक करून सध्याच्या ग्राहक सेवेचा दर्जा कायम ठेवावा असे नमूद केले. बँकेने तंत्रज्ञान क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीबाबत समाधान व्यक्त करून तंत्रज्ञान आधारित सेवा ही यापुढील काळात अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असेल असे नमूद केले. मात्र हे सर्व करत असताना या सर्व सेवांना आपलेपणाचा स्पर्श कायम राहील याची काळजी घ्यावी असेही नमूद केले.



मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंतराव कुलकर्णी यांनी लातूर शहरामध्ये शाखेने मागील ४९ वर्षामध्ये केलेल्या सामाजिक आणि आर्थिक कार्याची माहिती दिली. अर्थकारणाबरोबरच सामाजिक भान बँकेने कायम ठेवले असल्याचे नमूद केले. सह-महाव्यवस्थापक श्री. काकतकर साहेब यांनी बँकेच्या चालू आर्थिक वर्षातील प्रगतीचा आढावा सादर केला. बँक देत असलेल्या आधुनिक तंत्रज्ञान युक्त सेवा, नव्याने व्यापारी वर्गासाठी चालु करण्यात आलेली विशेष कर्ज योजना तसेच पुढील आर्थिक वर्षात आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

या मेळाव्यास लातुरचे माजी खासदार श्री. गोपाळराव पाटील, स्थानिक सल्लागार समिती सदस्य श्री. अप्पा लातुरे, श्री. प्रकाश कासट तसेच खातेदार, सभासद, हितचिंतक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र - संचालन श्री. प्रमोद नशीराबादकर यांनी केले. श्री. मिलिंद केळकर यांनी आभार मानले.

## कोकणदिवा चित्तथरारक ट्रेक

मी माझ्या पुण्यातील २ डॉक्टर मित्रांसह नुकताच कोकण - दिवा ट्रेक पूर्ण केला. पानशेत व वरसगाव या पुण्याजवळील २ धरण क्षेत्राच्या मधून एक रस्ता घोळ या मोटरगाडी जाऊ शकणाऱ्या गावापर्यंत जातो. पुण्यापासून हे अंतर साधारणपणे ७० कि. मी. आहे. या गावापर्यंतच वाहने जातात. आम्ही सकाळी ७.०० वा. पुण्याहून निघून साधारणपणे ९.३० वा. घोळ या गावी पोहोचलो. या ठिकाणी आम्ही वाटाड्या घेतला.

या गावातून कोकण - दिवा या ठिकाणी जाण्यासाठी गारजेवाडी या पुणे जिल्ह्याच्या शेवटच्या गावापर्यंत जावे लागते. हे अंतर घोळ पासून साधारणपणे २ कि.मी. आहे. या गावापर्यंत जाणेसाठी कच्चा रस्ता आहे. त्यापुढे सुमारे २ कि.मी. पायी जावे लागते. माळरानातून ही वाट जाते.



त्यानंतर कोकण दिव्यासाठी चढाई सुरू होते. साधारणपणे सुरूवातीला सोपी वाट आहे. मात्र पाऊण अंतर पार केल्यावर सुमारे ७०० ते ८०० फुट खडी चढाई पार करावी लागते. ही चढाई फारच दमछाक करणारी आहे. ही चढाई पार केल्यावर आपण एका टाक्यापाशी पोहोचतो. तेथून सभोवतालचा प्रदेश फारच सुरेख दिसतो.

आता कोकण - दिव्याला अंतिम टप्प्यातील चढाई करावी लागते. ही चढताना खडक (Rock patch) चढून कोकण - दिव्यावर जावे लागते. ही चढाई फारच अवघड आहे. आम्ही वाटाड्याच्या मदतीने अंतिम टप्पा पार करून कोकण दिव्यावर पोहोचलो. ही जागा साधारणपणे ४००० फुटावर आहे.

वरचा टप्पा हा एक खडक असून २० बाय ८ फुट एवढी जागा आहे. शिवकालीन काळात या जागेचा टेहाळणीसाठी वापर केला जात होता. कारण तेथून सभोवतालच्या प्रदेशावर विशेषतः कोकण परिसरातून ये-जा करणाऱ्यांवर लक्ष ठेवले जात असे. त्या दृष्टीने कोकण - दिवा ही मोक्याची जागा आहे. तेथून रायगड, लिंगाणा, कोकण परिसर दिसतो. कोकण - दिव्याची चढाई हा एक चित्तथरारक अनुभव होता.

सुमारे १ तास थांबल्यावर उतरणीसाठी सुरूवात केली. उतरताना निम्मे अंतर फारच काळजीपूर्वक उतरावे लागले. कारण खडी चढण जशी चढलो तशीच उतरताना फारच काळजीपूर्वक उतरावे लागले कारण काही ठिकाणी मुरूम होता. पुन्हा गारजेवाडी, घोळ मार्गे सायंकाळी ६.०० वा. पुणे येथे परत आलो.

ट्रेकचा एक चित्तथरारक अनुभव घेतला!

**राजेंद्र वि. वर्तक**

सहाय्यक महाव्यवस्थापक ऑडिट इन्स्पे. विभाग

## इंदापूर शाखेचे खातेदार 'सोनाई दूध प्रकल्पाची' यशस्वी घोडदौड

**इंदापूर :** अमृतसर (पंजाब) येथील सुवर्ण मंदिरात लंगरमधील प्रसादासाठी आपल्या इंदापूर शाखेचे खातेदार, डेअरी अँड मिल्क प्रॉडक्ट्सच्या 'सोनाई' दूध प्रकल्पाचे तूप वापरण्यात येणार आहे. दूध भुकटी व तुपाचे वाहन नुकतेच अमृतसरला रवाना झाले. त्यास 'सोनाई प्रकल्पाचे' अध्यक्ष दशरथ माने यांनी हिरवा झेंडा दाखवला.

अमृतसर येथील सुवर्ण मंदिर, रोप्पार येथील आनंदपूर साहेब व भटिंडा येथील गुरुद्वारामध्ये प्रसादासाठी रोज १५ टन देशी गावरान तूप व पाच टन दूध भुकटीचा वापर केला जातो. त्यासाठी शिरोमणी गुरुद्वार प्रबंधक समितीकडून देशभरातून तूप व दूध भुकटीसाठी निविदा मागविल्या होत्या. त्यांच्या उच्चस्तरीय तांत्रिक समितीपुढे सोनाईचे तूप व दूध भुकटीने आपला दर्जा सिद्ध केल्याने वर्षभरासाठी सोनाईची निविदा मंजूर करण्यात आली. या संदर्भात माने म्हणाले, ''सोनाई दूध प्रकल्पाने सलग तीन वर्षे शिर्डी येथील श्री साईबाबा देवस्थानाला तुपाचा पुरवठा केला आहे. चौथ्या वर्षीसुद्धा सोनाईची निविदा मंजूर झाली आहे. गुजरातमधील अंबाजी देवस्थान, तिरुपती देवस्थानालाही प्रसादासाठी सोनाईकडून तूप पाठविले जाते. आता अमृतसर येथील सुवर्ण मंदिर, रोप्पार येथील श्री आनंदपूर व भटिंडा येथील तलवंडी साबो गुरुद्वाराची निविदा मंजूर झाली आहे. स्पर्धेच्या युगात सोनाईने आपला दर्जा सिद्ध केला आहे.''

अमृतसरसाठी पहिला ट्रक रवाना करण्याचा कार्यक्रम शुक्रवार दि. १७/४/२०१५ रोजी झाला. त्यात प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी संचालक श्री. विष्णुकुमार माने, संचालक श्री. अतुल माने, श्री. किशोर माने, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एस. एन. सिंग, उपाध्यक्ष श्री. मिलिंद कौलगी, श्री. बी. एस. आव्हाड, श्री. व्यंकटेश शुक्ला, जनता बँकेच्या इंदापूर शाखेचे व्यवस्थापक श्री. मेंडजोगी, श्री. बाबासाहेब जाधव आदी उपस्थित होते.

## छोट्या कर्जांचे महत्त्व

बँकांच्या उत्पन्नात कर्जावरील व्याजाचा सहभाग अधिक असतो. त्याचबरोबर कर्ज थकीत झाल्यास बँकांना कर्जावर व्याज आकारता येत नाही आणि थकीत कर्जावरील तरतुदीमुळे बँकांच्या नफ्यावर विपरीत परिणाम होतो. प्रभावी कर्ज विस्तारासाठी बँकांनी वितरीत केलेले प्रत्येक कर्ज नियमितच राहील यासाठी सतर्क राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने नुकत्याच प्रकाशित केलेल्या अहवालानुसार छोट्या कर्जावरील परतावा इतर कर्जाच्या तुलनेने अधिक आहे. त्याच बरोबर थकीत छोट्या कर्जांचे प्रमाण इतर कर्जाच्या तुलनेने नगण्य आहे. वैयक्तिक तारण कर्ज, सोने तारण कर्ज, वाहन कर्ज, शेअर्स - एन. एस. सी. - आयुर्विमा पॉलीसी तारण कर्ज, क्रेडीट कार्ड इ. कर्जे छोटी कर्जे या प्रवर्गात येतात. छोटे व्यावसायिक, नोकरी पेशा मध्यम वर्ग, शहरी गरीब, कामगार, मजूर इ. घटकांच्या गरजा छोटी कर्जे पूर्ण करतात.

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर १९५१ साली देशाच्या आर्थिक विकासाला पहिल्या पंचवार्षिक योजनेने सुरुवात झाली. पुढे १९६९ साली सरकारने बँकांचे राष्ट्रीयीकरण करून आर्थिक व्यवस्थेचा छोट्या पण प्रमुख घटकांना विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला. गेली अनेक वर्षे केंद्र आणि राज्य सरकारच्या विकासनितीचा केंद्र बिंदू गरीब आणि गरिबी निर्मूलन हाच राहिला आहे. मध्यमवर्गाच्या आर्थिक उन्नतीसाठी मात्र सरकारने विशेष प्रयत्न केले नाहीत. परिणामस्वरुप मोठ्या प्रमाणावर गरीब वर्ग सक्षम होऊन मध्यमवर्गात दाखल झाला. ग्रामीण भागात पुरेशा रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे हा मध्यमवर्ग शहराकडे वळला. आज आपल्या देशाच्या लोकसंख्येमध्ये शहरी मध्यम वर्गाचे प्रमाण दोन तृतीयांश पेक्षा अधिक आहे. छोट्या कर्जाच्या विस्तारासाठी ही पर्वणीच आहे. कारण छोटी कर्जे शहरी मध्यम वर्गाची गरज आहेत.

खुल्या अर्थव्यवस्थेच्या अंगीकारानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकांवरील बंधने शिथील केली पण त्याच बरोबर बँकांच्या प्रभावी नियंत्रणासाठी त्यांच्या मूल्यांकनाचे कठोर निकष लागू केले. प्रोव्हिजन कव्हरेज रेशिओ सारख्या उपाय योजनामुळे थकीत कर्जावरील तरतूद वाढते आहे. मोठ्या कर्जाची रक्कम



अधिक असल्यामुळे ती कर्जे थकीत झाल्यास त्यांच्यावर कराव्या लागणाऱ्या तरतुदीमुळे बँकांचा नफा कमी होतो. छोट्या कर्जाची रक्कम कमी असल्यामुळे छोट्या थकीत कर्जाचा नफ्यावर विशेष परिणाम होत नाही.

छोट्या कर्जाचे महत्त्व वाढत असल्यामुळे देशातील सर्व बँका, नॉन बँकींग फायनान्शिअल कंपन्या, सहकारी पतसंस्था या कर्ज विस्तारासाठी जोमाने प्रयत्न करीत आहेत. हे स्पर्धक ग्राहकांना आकृष्ट करण्यासाठी त्यांच्या कर्ज योजनांमध्ये उपयुक्त बदल आणि विपणनात अत्यंत प्रभावी साधनांचा वापर करीत आहेत. आपणही आपल्या बँकेतील छोट्या कर्जाच्या विस्तारासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्रति कर्जदार कर्जाची रक्कम कमी असल्यामुळे छोट्या कर्जाच्या माध्यमातून कर्ज विस्तारासाठी अधिक संख्येने कर्जप्रस्तावांची आवश्यकता आहे आणि म्हणून छोट्या कर्जाच्या विपणनासाठी प्रभावी उपाय योजना राबवावी लागेल. शहरी गरीब, मध्यमवर्गीय ग्राहकामध्ये आपल्या बँकेचे विशेष स्थान आहे. गेली साडे सहा दशके आपल्या बँकेचा भौगोलिक विस्तार महाराष्ट्राचे दक्षिण टोक रत्नागिरी ते गुजरात राज्याचे उत्तर टोक खेडब्रह्मा असा प्रदीर्घ झालेला आहे. प्रत्येक शंभर मैलानंतर बँकांचे ग्राहक, त्यांची वागणूक, त्यांचे राहणीमान, दरडोई उत्पन्न, त्यांच्या प्राथमिकता, बाजारातील स्पर्धक आणि त्यांची उत्पादने यात आमुलाग्र बदल होत असतो. भौगोलिक बदलाबरोबरच ग्राहकांच्या गरजा तसेच त्यांच्या बँकेकडून अपेक्षा देखील बदलतात. मुख्य कार्यालयाने निर्माण केलेले छोट्या कर्जाचे स्ट्रक्चर्ड लोन प्रॉडक्ट, प्रत्येक उपभोक्त्याच्या गरजा सामावून घेवू शकेल याची त्यामुळे हमी देता येत नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक शाखेने आपल्या पंचक्रोशीतील शहरी गरीब तसेच छोटे व्यावसायिक आणि मध्यमवर्गीय यांच्या गरजांचा तसेच त्यांच्या बँकेकडून अपेक्षांचा सखोल अभ्यास करून आपल्या बँकेच्या छोट्या कर्जात अनुरूप बदल मुख्य कार्यालयास सुचवावेत आणि छोट्या कर्जाच्या विस्तारात सक्रीय सहभागी व्हावे.

■ ■ ■

## माहे मार्च व एप्रिल २०१५ या कालावधीत सेवा निवृत्त झालेले सेवक

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री. सतीश य. भागवत | टिळक रोड | कनिष्ठ अधिकारी | श्री. गंगाधर चिं. दामले | सीआयसीडी विभाग | लेखनिक |
| श्री. नाथ य. कुलकर्णी | सहकारनगर | कनिष्ठ अधिकारी | सौ. मनिषा सु. लोणकर | हिशोब विभाग | लेखनिक |
| श्री. चंद्रकांत वा. गोसावी | लातूर | कनिष्ठ अधिकारी | श्री. सुनिल सु. गुजराथी | चिंचवड गाव | लेखनिक |
| श्री. अविनाश वि. खेडकर | चिंचवड गाव | कनिष्ठ अधिकारी | श्री. अशोक ल. शिंदे | भवानी पेठ | शिपाई |

# राज्यपाल मा. श्री. पद्मनाभ आचार्य यांची बँकेस सदिच्छा भेट

**पुणे :** नागालँडचे राज्यपाल श्री. पद्मनाभ आचार्य यांनी दि. २१ एप्रिल रोजी बँकेच्या मुख्य कार्यालयास सदिच्छा भेट दिली. बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर व उपाध्यक्ष श्री. संजय लेले यांनी मा. राज्यपालांचे स्वागत केले. उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन राज्यपाल पद्मनाभ आचार्य यांनी आपले विचार व्यक्त केले. बँकेतर्फे त्यांना श्री. खळदकर यांनी लिहिलेले व एकता मासिक प्रकाशनाद्वारे प्रकाशित 'नवल वर्तले' हे पुस्तक सप्रेम भेट देण्यात आले. यावेळी संघाचे अ.भा.कार्यकारिणी सदस्य मा. श्री. मदनदासजी देवी, मा. श्री. हरिभाऊ मिरासदार, एकताचे संपादक मा. श्री. विद्याधर ताठे, बँकेचे संचालक श्री. सुधीर पंडित, श्री. बिरुजी खोमणे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंतराव कुलकर्णी, श्री. जयंत काकतकर व इतर वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते. या पुणे भेटीत राज्यपाल श्री. आचार्य यांनी पुना मर्चंट चेंबर, सारस सहकारी पतसंस्था, महर्षि कर्वे संस्था आणि सिंबायोसिस या संस्थांना भेटी दिल्या.



# बँकेच्या नूतनीकृत घोडनदी शाखेचे उद्‌घाटन



**पुणे :** आपल्या बँकेच्या घोडनदी (शिरूर) शाखचे नवीन एटीएम सेंटर आणि नूतन आणि प्रशस्त वास्तू स्थलांतर व उद्घाटन शिरूरचे आमदार श्री. बाबुराव पाचर्णे आणि उद्योजक श्री. प्रकाश धारिवाल यांच्या हस्ते सोमवार दि. ६/४/२०१५ रोजी झाले. या प्रसंगी रा. स्व. संघाचे विभाग संघचालक श्री. आप्पा गवारे, बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर, घोडनदी शाखेचे संपर्क संचालक श्री. जगदिश कदम, संचालक श्री. बिरू खोमणे तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

आ. श्री. पाचर्णे यांनी ही बँक शिरूरमधील बहुसंख्य खातेदार, नोकरदार, व्यापारी, उद्योजक यांच्या विश्वासाची बँक असून लवकरच घोडनदी शाखेने व्यवसायात शिरूर तालुक्यातील सर्व बँकांमध्ये प्रथम स्थान प्राप्त करावे असे म्हटले.

मा. श्री. प्रकाशशेठ धारिवाल म्हणाले की, ''या बँकेच्या पूर्वीच्या वास्तूचे उद्‌घाटन माझ्या वडिलांनी केले होते, या वास्तूचे उद्‌घाटन माझ्या हस्ते होत आहे याचा मला खूप आनंद वाटतो. या बँकेच्या संचालकांची आणि सेवकांची या बँकेतील कामकाजात असणारी समर्पित वृत्ती यामुळे ही बँक सर्व उद्योजक आणि व्यापाऱ्यांना आपली, विश्वासाची वाटते. त्यामुळे या बँकेला भविष्यात व्यवसायात काहीही आणि कधीही कमी पडणार नाही. अधिकाधिक ग्राहक बँकेकडे येऊन जोडले जातील.''

घोडनदी शाखेचे संपर्क संचालक श्री. जगदिश कदम यांनी अनेक ग्राहकांच्या बऱ्याच दिवसांपासून असणाऱ्या वातानुकूलित शाखेच्या मागणी विचारात घेऊन नूतन वास्तू संपूर्ण वातानुकूलित करून देत आहोत, असे मत व्यक्त केले. नुकत्याच संपलेल्या मार्च २०१५ च्या वर्षाअखेर बँकेने रु. ११८२० कोटीच्या एकूण व्यवसायाचा टप्पा पूर्ण केला असल्याचे नमूद केले. मार्च १५ अखेर बँकेच्या ४६ शाखा असून या आर्थिक वर्षात नवीन ८ शाखा उघडण्याचा बँकेचा मानस असल्याचे व्यक्त केले. त्याच वेळी घोडनदी शाखेचा व्यवसाय रु. १५० कोटी झाला आहे. सध्याच्या सहकारी बँकांच्या तुलनेत जनता बँकेची कामगिरी अग्रेसर आहे. कार्यक्रमाच्या अखेरीस घोडनदीशाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. मनोजकुमार व्यास यांनी उपस्थितांचे व सर्व ग्राहकांचे आभार मानले.

## भवानी पेठ शाखेचा विशेष उपक्रम

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच जाहीर केलेल्या जीवन ज्योती विमा योजना, सुरक्षा योजना व अटल पेन्शन योजना सर्वसामान्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून या योजना भारतातील सर्व बँकांमधून सध्या राबविण्यात येत आहेत.

आपल्या बँकेच्या सर्व शाखांमधून या योजना कार्यान्वित करण्यात आल्या असून त्याला चांगला प्रतिसाद लाभत आहे. आपल्या भवानी पेठ शाखेचे व्यवस्थापक श्री. गिरीधर खैरनार व त्यांच्या सहकाऱ्यांनी भवानी पेठ परिसरातील सर्व वस्त्यांमध्ये जाऊन या योजनांची माहिती दिली. त्याचबरोबर दि. १६ मे रोजी महिला मेळावा घेऊन हा विशेष उपक्रम राबविला.



# भोर शाखेला ना. एकनाथ खडसे, ना. गिरीश बापट व ना. दिलीप कांबळे यांनी दिली भेट!







भोर परिसरातील सरकारी कामाचे निमित्ताने जानेवारी महिन्याचे शेवटी महाराष्ट्र राज्य सरकारातील सन्मानीय ना.श्री. एकनाथराव खडसे महसूल मंत्री,ना.गिरीश बापट अन्न नागरी पुरवठा मंत्री (जिल्हाचे पालकमंत्री) ना.दिलीप कांबळे –सामाजिक न्याय राज्यमंत्री हे भोर शहरात उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान सर्व माननियांना शाखेस भेटीचे निमंत्रण दिले असता मुख्य कार्यक्रमानंतर सर्व माननियांनी शाखेस भेट दिली. शाखेची माहिती घेतली .बँकेच्या व शाखेच्या प्रगतीचे कौतुक केले.बँकेच्या वतीने शाखाव्यवस्थापक श्री. श्रीधर विसाळ यांनी त्यांचे स्वागत व सत्कार केला याप्रसंगी सहायक शाखा व्यवस्थापक श्री. मदन यादव, शाखेतील सर्व सेवक वर्ग तसेच स्थानिक सल्लागार समिती सदस्य श्री. विनायक सणस, श्री.विजय दुसंगे,सुभाष फेरवाणी आणि शाखेचे असंख्य खातेदार उपस्थित होते.

## खाते नंबर कोठे लिहिला ?

एका पेंशनरला पेंशन रिव्हिजन संदर्भात एक फॉर्म आम्ही दिला. फॉर्मवर कोपऱ्यात खाते नंबर लिहिण्यास आम्ही सांगितले. फॉर्म घेऊन दहा मिनिटांनी पेंशनर फॉर्म देण्यास आले. आम्ही सहजच विचारले की, आपण कोठे जाऊन आलात. ते म्हणाले तुम्हीच सांगितले की कोपऱ्यात नंबर टाका म्हणून ते बँकेच्या हॉलच्या कोपऱ्यात गेले व तेथे जाऊन खाते नंबर लिहिला. फॉर्मवर कोपऱ्यात नंबर लिहा असे आम्ही सांगितले त्यातील फक्त कोपऱ्यात नंबर लिहा एवढेच त्यांनी ऐकले त्यामुळे हा विनोद घडला. त्यामुळे आम्हा सर्वांचे मनोरंजन झाले.

***

"There must be some mistake - where it says 'Reson for Loan' you have 'gasoline and coffee"



## हार्दिक अभिनंदन!

### शिवाजीनगर (रत्नागिरी) शाखेचे सभासद खातेदार श्री. राजेश नेने यांच्या कन्येचे पॉवर लिफ्टिंगमध्ये घवघवीत यश



शाखेचे सभासद खातेदार श्री. राजेश नेने यांची कन्या कु. नेहा ही रत्नागिरी येथिल गोगटे जोगळेकर महाविद्यालयात १२ वी कॉमर्स मधे शिकत आहे.

पॉवर लिफ्टिंग या खेळामध्ये प्राविण्य दाखवत तिने गेल्यावर्षी ५७ किलो वजनी गटात जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. या आधारे तिची वेंगुर्ला येथील राज्यस्तरीय स्पर्धे करीता निवड झाली. तिथे तिने वरील वजनी गटात एकूण १९८ इतके वजन उचलून दुसरा क्रमांक पटकावला.

नंतर मार्च २०१५ मध्ये पंजाब मधील कपूरथळा येथे झालेल्या राष्ट्रीय डेड लिफ्ट स्पर्धेसाठी महाराष्ट्रातर्फे सब ज्यू. गटात निवड झाली. या स्पर्धेत तिने ५७ किलो वजनीगटात सुवर्णपदक प्राप्त करून घवघवीत यश संपादीत केले आहे.

तिच्या या यशाबद्दल समाजातील सर्व स्तरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### श्री. मिलिंद जोशी (सेवा विभाग) यांची पोहोण्याच्या स्पर्धांमधील यशस्वी कामगिरी

नुकतीच दि. २६/०४/२०१५ रोजी सर परशुरामभाऊ महाविद्यालय पुणे यांचे जलतरण तलावावर मैत्री ग्रुप, पुणे आयोजित ''श्रीमंत मास्टर्स पोहणे स्पर्धा'' प्रौढ व ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित केली होती.

या स्पर्धेत विविध तलावांवरील क्लब पुरस्कृत स्पर्धक सामील झाले होते. बँकेतील सेवा विभागातील अधिकारी श्री. मिलिंद केशव जोशी यांनी वय वर्षे ५१ ते ५५ या वयोगटात ५० मीटर फ्रीस्टाईल व ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक या स्पर्धेत अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

## वाचकांना नम्र आवाहन

गरूड झेप मध्ये प्रकाशित करण्यासाठी शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग यांचे विषयी उपयुक्त तसेच महत्त्वाची बातमी, माहिती, विशेष उपलब्धी, गौरव पुरस्कार छायाचित्रांसह ए फोर साईजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्य अक्षरात लिहून बंद पाकिटात खालील पत्त्यावर पाठवावा. **पत्ता : श्री. जयंत लोकरे, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे., मो. क्र. : ९९७०८००३४८**

**गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल. * ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com**

गरुड झेप

गरूड झेप ही गृहपत्रिका केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.

दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)